www.crimeborder.com

पोलीस व गुन्हेगारी जगताची बित्तंबातमी देणारे

# क्राईम बॉर्डर

Year 12 ★ Issue 05 ★ Pages - 4 ★ Kalyan,Dist Thane, Monday 01JuneTo 15 June 2022 ★ Price 5.00 ★ R.N.I. No. : MAHBIL/2010/41122 Mbo.No. 9619630035

★ वर्ष : १२ ★ अंक : ०५ ★ पाने : ४ ★ कल्याण, जि. ठाणे, सोमवार ★ ०१ जून ते १५ जून २०२२ ★ मूल्य : रु ५.००/- नोंदणी क्र.एमएएचबीआयएल/२०१०/४११२२

## प्रेयसीचं दुसऱ्याशी लग्न ठरल्याने प्रियकराने घरात घुसून केली तिची हत्या; नंतर तिच्याच बेडरुममध्ये घेतला गळफास!

### डोंबिवली खळबळजनक घटनेनं हादरली!

**प्रेयसीचं दुसऱ्याशी लग्न ठरलं, प्रियकर म्हणाला' तू माझी नाहीस तर कुणाचीच नाहीस' प्रेयसीचं दुसरं लग्न ठरल्याने संतापलेला प्रियकर तिला शेवटचं भेटायला गेला... अन्...**



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**डोंबिवली** : प्रेयसी आपल्याला सोडून दुसऱ्याबरोबर लग्न करत असल्याच्या रागातून प्रियकराने धक्कादायक कृत्य केलं. या घटनेने डोंबिवलीत खळबळ उडाली आहे. प्रेयसीची हत्या करुन प्रियकराने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

नाशिक मधील वडनेर भैरव इथं राहणाऱ्या अनिल साळुंखे याचं डोंबिवलीत निळजे कासारियो गोल्ड सोसायटीमध्ये राहणाऱ्या तरुणीबरोबर प्रेम संबध होते. मात्र अनिल हा विवाहित असून त्याला दोन मुले असल्याची माहिती मुलीच्या कुटुंबीयांना मिळाल्याने कुटुंबीयानी तिचं दुसऱ्या मुलाशी लग्न ठरवलं. काही दिवसापूर्वी तिचा साखरपुडा देखील झाला होता. मात्र आपली प्रेयसी दुसऱ्या कोणाबरोबर तरी लग्न करत असल्याची माहिती अनिलला मिळाली. संतापलेल्या अनिलने २९ मे रोजी रात्रीच्या सुमारास भेटण्याच्या बहाण्याने त्या तरुणीच्या घरी गुपचूप प्रवेश केला. मला शेवटचं तुझ्याशी बोलायचं आहे असं त्याने तिला सांगितलं.

पण घरात गेल्यावर अनिलने रागाच्या भरात प्रियसीचा नायलॉन दोरीने गळा आवळला, एवढ्यावरच न थांबता त्याने उशीने तिचं नाक तोंड दाबलं. यात तरुणीचा जागीच मृत्यू झाला. त्यांनतर त्याच नायलॉनच्या रस्सीने स्वत: गळफास घेत आत्महत्या केली. सकाळी ११ वाजन्याच्या सुमारास हाका मारूनही मुलगी दरवाजा उघडत नसल्याने तिच्या बहिनेने दरवाजा उघडून पाहिल्यानंतर तिला धक्काच बसला.

याप्रकरणी मानपाडा पोलिसांना माहिती देण्यात आली. डोंबिवली पूर्व निळजे कासारिया गोल्ड या हाय प्रोफाइल सोसायटीमध्ये घडलेल्या या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे याप्रकरणी मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

★★★

## महागड्या दुचाक्या चोरुन हौस मौज करणं आलं अंगलट, बाईक चोर गॅरेज मॅकेनिक गजाआड



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**डोंबिवली** : महागड्या बाईक चोरून हौस मौज करणे एका गॅरेज मॅकेनिकला चांगलेच महागात पडले आहे. बुलेट चोरी प्रकरणी डोंबिवली पोलिसांनी या गॅरेज मॅकेनिकला अटक केली आहे.

राज तावडे असं या चोरट्याचं नाव आहे. त्याच्याकडून चोरी केलेल्या पाच दुचाक्या पोलिसांनी हस्तगत केल्या असून चार गुन्ह्यांची उकल झाली आहे. आरोपी मॅकेनिक राज तावडेने आणखी बाईक चोरल्या असाव्यात असा संशय पोलिसांनी व्यक्त करत पुढील तपास सुरू केला आहे. डोंबिवली परिसरात दुचाकी चोरी करण्याच्या घटना वाढल्या आहेत. या प्रकरणी पोलीस चोरट्यांच्या मागावर होते. एका बुलेट चोरी प्रकरणाचा तपास सुरू असताना पोलिसांना चोरी गेलेली बुलेट एक तरुण चालवत असताना सीसीटीव्हीमध्ये दिसून आला. सीसीटीव्ही च्या आधारे पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला. चोरट्याचं नाव राज तावडे असं असल्याचं समोर आलं.

आरोपी डोंबिवली पूर्वेकडील आयरे गावात राहत असल्याची माहिती डोंबिवली पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ या भागातून आरोपी राज तावडे याला ताब्यात घेतले. त्याची चौकशी केली असता त्याने केलेल्या गुन्ह्यांची कबुली दिली. राज हा याच परिसरात एका गॅरेजमध्ये मेकॅनिक म्हणून काम करत होता. त्यामुळे त्याला विना चावी गाड्यांचा हँडल लॉक कसे उघडायचे, गाडी कशी सुरू करायची याबाबत माहिती होती.

आपल्या मॅकेनिकल कौशल्याचा फायदा घेत आरोपीने गेल्या दोन महिन्यांपासून दुचाकी चोरण्याचा सपाटाच लावला होता. चोरी केलेल्या बाईक तो स्वत:च्या हौसेसाठी स्वत:च वापरत होता. चोरी केलेल्या काही बाईक त्याने मित्रांना वापरण्यासाठी दिल्या होत्या. पोलिसांनी त्याच्याकडून आत्तापर्यंत पाच महागड्या बाईक हस्तगत केल्या आहेत. आरोपी राजने आणखी बाईक चोरी केल्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली असून त्यादृष्टीने पोलिसांचा तपास सुरू आहे, अशी माहिती डोंबिवली पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक योगेश सानप यांनी दिली. ★★★

## गांजासाठी पैसे हवेत म्हणून प्रवासा दरम्यान केली ओला चालकाची हत्या!



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**ठाणे** : ठाण्यामध्ये दिव्याजवळील खर्डी रोडवर हा सारा प्रकार घडल्यानंतर पोलिसांनी अवघ्या १० तासांमध्ये चारही आरोपींना जेरबंद केलं

अडीच हजार रुपयांसाठी ओला चालकाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना ठाण्यामध्ये उघडकीस आलीय. ठाण्यातील शिळ डायघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे. ठाण्यातील दिवा परिसरातील खर्डी रोडवर हे हत्याकांड घडलं असून या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आलीय.

भाड्याने ओला गाडी बुक करून काही इसम दिवा येथे जाण्यासाठी हत्या करण्यात आलेल्या तरुणाच्या गाडीत बसले. प्रवासादरम्यान दिव्याजवळील खर्डी रोडवर लघुशंका करण्याच्या बहाण्याने या तरुणांनी गाडी थांबवली. त्यानंतर त्यांनी पैशांवरुन वाद सुरु केला. या सर्वांनी गाडी चालकाला गाडीखाली उतरवून त्याच्या डोक्यात दगड आणि पेव्हरब्लॉक मारून त्याची हत्या केली. ठाण्यातील शिळ डायघर पोलीसांना २९ मे रोजी सकळी दिवा गावातील एका शेतकऱ्याने एका अज्ञात इसमाचा खून झाला असून त्याचा मृतदेह खर्डी रोडकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावरील ब्रिजखाली अर्धनग्न परिस्थितीत पडला असल्याची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच शिळ डायघर पोलीस घटनास्थळी पोहचले.पोलिसांनी पंचनामा केला असता मयत व्यक्तीच्या डोक्यात दगड आणि पेव्हरब्लॉक मारून त्याची हत्या केली असल्याचे निष्पन्न झाले. तसेच मृतदेहाच्याजवळ एक ओला कंपनीची गाडी उभी असलेली पोलिसांना आढळून आली. तपासादरम्यान पोलिसांनी गाडीच्या नंबरवरून ओला कंपनीमार्फत मयताची ओळख पटवली. मयत ओला चालकाचे नाव मोहम्मद अली अन्सारी असून तो घाटकोपर मुंबई येथील असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी लगेचच तांत्रिक यंत्रणाच्या मदतीने तपालासा सुरुवात केली असता पोलिसांनी तब्बल १० तासात आरोपींना गजाआड केले आहे. या प्रकरणात पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. तर एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतलंय.

हसिरूल हालीम शेख (३६), आतिश भोसले (२१), ओंकार कासेकर (२१)

उर्वरीत पान नं. ३ वर...

## आई व मुलाने केला ब्युटी पार्लर च्या संचालिकेचा केला निर्घुण खून!

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**कल्याण** : राग हा माणसाला कोणत्या थराला नेईर्ल हे काही सांगता येत नाही .रागाच्या भरात माणूस मागचा व पुढचा विचार न करता आपले भविष्य अंधारकोठडीत ढकलतो.यामध्ये तरुण-तरुणी यांचा भरणा जास्त असल्याचे दिसत आहे ,काही वेळेस संपत्तीचा वाद तर मोठ्या प्रमाणात प्रेम प्रकरणातून खून आत्महत्या अशी उदाहरणे दररोज कुठे ना कुठे घडत असतात.आयुष्य हे क्षणभंगुर आहे हे कुण्या भविष्यवेत्ते च्या सांगण्याची गरज नाही.

गेल्या २० वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशातील महू जिल्ह्यातील राजेश जैसवार वय वर्षे ३९ हे पोटापाण्याच्या शोधात आपला गाव सोडून दोन पैसे कमावण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील कल्याण या शहरात आले. या ठिकाणी त्यांच्या गावाकडील काही मंडळी यापूर्वीच आलेली होती.त्यापैकी त्यांच्या ओळखीच्या मित्रांशी त्यांनी संपर्क साधला व माझ्यासाठी काहीतरी काम बघून मिळवून द्या अशी विनवणी केली. त्यांच्या मित्रांनीही त्याला थोड्याच दिवसात एका खाजगी कंपनीत कामाला लावून दिले. मग राजेशने एक लहान रुम भाड्याने घेतली व आपल्या मित्रांच्या घरून आपले बाळ बिस्तार उचलले आणि तिथे तो राहू लागला दिवसामागून दिवस जाऊ लागले राजेश आता स्थिरस्थावर होऊ लागला होता. आलेल्या पगारातून खर्चा



आरोपी समवेत पोलीस पथक



मयत दुर्दैवी सौ.रंजना

पुरते पैसे काढून बाकी पैसे तो आपल्या गावी आई-वडिलांकडे पाठवू लागला. राजेश चे वय आता लग्नायोग्य झाले होते. त्याच्या घरच्यांनी त्याच्यासाठी मुलीचा शोध घेणे सुरू केले. राजेश सुद्धा भावी आयुष्या बद्दल स्वप्ने रंगवू लागला होता. लवकरच त्याच्या आई-वडिलांनी त्याच्या साठी एक मुलगी बघितली तिचे नाव रंजना होते ती शिक्षित होती. पाहण्याचा प्रोग्राम झाल्यानंतर मुलगा व मुलगी या दोघांच्या पसंतीने आणि घरच्यांच्या सहमतीने त्यांचा विवाह करून देण्यात आला.नव्या नवरीचे नऊ दिवस संपल्यानंतर राजेश हा त्याची पत्नी रंजना हिला घेऊन कल्याण येथे राहायला आला रंजना ही सुशिक्षित असल्याने आपण काही तरी करून संसाराला हातभार लावावा यासाठी विचार करत होती. तिने पती राजेशला गोड बोलून सांगितले की, मी ब्युटी पार्लरचा कोर्स करून घेते आणि घरच्या घरी मी तो व्यवसाय करेन, हे राजेशला सुध्दा पटले आणि त्याने तिला ब्युटी पार्लरचा कोर्स लावून दिला.सौ. रंजनाने मन लावून तो कोर्स पूर्ण केला आणि ती घरच्या घरीच प्रॅक्टिस करू लागली ती हळूहळू यात पारंगत झाली.राजेश सर्व पगार आणि ब्युटी पार्लर च्या व्यवसायातून जमा होत असलेली रक्कम सेविंग करू लागले. हळूहळू बँकेत यांची रक्कम जमा होती राजेश हा पत्नी रंजना वर जीवापाड प्रेम करत होता तर रंजना सुद्धा खुश होती की आपल्याला जीव लावणारा जीवनसाथी मिळाला. या जीवनसाथी साठी आपण मेहनत घ्यायला काय हरकत आहे, असे म्हणून ती घरातील सर्व कामे आटपून मन लावून ब्युटी पार्लरचा व्यवसाय करू लागली यादरम्यान त्यांना अपत्यप्राप्ती झाली. त्यांच्या संसारवेलीवर फुललेल्या कळीने त्यांच्या संसारात रंगत आली. हळूहळू त्यांच्या संसारवेलीवर तीन फुले उमलली.त्यांचा संसार सुखा समाधानात सुरू होता आता आपण कधीपर्यंत भाड्याच्या घरात राहायचे म्हणून आपण स्वत:चे घर घ्यावे यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केला इकडून तिकडून पैसे जमवून त्यांनी कल्याण पूर्वेतील शास्त्रीनगर मलंग

उर्वरीत पान नं. २वर...

## नितीन सैद यांची क्राईम बॉर्डर च्या पुणे विभागीय संपादक पदी नियुक्ती

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

डोंबिवली : राजगुरुनगर जि.पुणे येथे स्थायिक असलेले व क्राईम बॉर्डर परिवारात गेल्या ७ वर्षापासून कार्यरत असलेले वरिष्ठ समाजसेवक तथा माहिती अधिकार कार्यकर्ते तसेच अनेक पुरस्कार प्राप्त श्री.नितीन सैद यांच्या कार्याची विशेष दखल घेत त्यांची क्राईम बॉर्डर चे संस्थापक राजेंद्र वखरे यांनी श्री.नितिन सैद यांची क्राईम बॉर्डर,परिवारासाठी घेत असलेली मेहनत तसेच पावन भूमी चॅरिटेबल ट्रस्ट,कल्याण च्या माध्यमातून ते करीत असलेली समाजसेवा, तसेच क्राईम बॉर्डर चे वर्षभरातील आयोजित असलेले सामाजिक उपक्रम यामध्ये त्यांचा हिरीरीने असलेला सहभाग तसेच त्यांचे संघटन कौशल्य या सर्व बाबींचा विचार करून त्यांची पुणे विभागीय संपादक पदावर मानसेवी नियुक्ती करण्यात आली आहे.





सदर नियुक्ती पत्र व ओळखपत्र क्राईम बॉर्डर चे मुख्य कार्यालय डोंबिवली येथे प्रदान करण्यात आले असून त्यांना या विभागात वृत्तपत्र व न्यूज पोर्टल साठी जिल्हा प्रतिनिधी व तालुका प्रतिनिधी तसेच शहर प्रतिनिधी नियुक्त करण्याचे अधिकार बहाल करण्यात आले आहे. त्यांच्या या निवडीने मित्रपरिवारात आनंद पसरला असून त्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.त्यांना क्राईम बॉर्डर परिवारातर्फे पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# आई व मुलाने केला ब्युटी पार्लर च्या संचालिकेचा केला निर्घुण खून !


पान नं. १ वरुन ... रोड चक्कीनाका याठिकाणी प्रभावती निवास मध्ये रूम नंबर २५६ पसंत केला व त्यांनी तो फ्लॅट विकत घेतला.सर्व काही सुरळीत सुरू होते. त्यांच्या लग्नाला आता वीस वर्ष होण्यात आली होती. मुलं हे कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते.घर खर्च व मुलांचे शिक्षण या तारेवरच्या कसरती मध्ये दोघेही तावून-सुलाखून निघत होते एकंदरीत त्यांचा हा हसता खेळता परिवार एकमेकावर प्रेम करत आनंदाने जगत होता परंतु त्यांच्या या सुखी संसाराला कुणाची तरी नजर लागेल असे त्यांनी स्वप्नातही बघितले नव्हते.या परिसरामध्ये सौ. रंजना हिचा ब्युटी पार्लरचा व्यवसाय चांगल्या प्रकारे चालत असल्याने दोन पैसे गाठीला जमत होते. सौ. रंजनाची ब्युटी पार्लर च्या व्यवसायातून परिसरात चांगलीच ओळख निर्माण झाली होती. याच ओळखीतून व परिसरात राहत असणाऱ्या लालसादेवी अनंत लाल राजभर हिच्याशी ओळख झाली लालसादेवीला अजय वर २६ व विजय वय २१ अशी दोन मुले आहेत.

लालसादेवी राजभर ही सुद्धा गेल्या वीस-बावीस वर्षांपूर्वी आपल्या पतीसमवेत उत्तर प्रदेशातील महू जिल्ह्यातून कल्याण येथे आली होती. तिच्या दुर्दैवाने तिच्या पतीचे निधन झाल्याने तिच्यावर तिच्या दोघं मुलांची जबाबदारी पडली .लालसादेवीला एकूण दोन मुले आहेत.त्यांची नावे तिच्या पतीने व लालचादेवीने अजय व विजय असे ठेवले होते. अजय व विजय ची जोडी कमालीची हुशार होती .परंतु वडिलांच्या अकाली जाण्याने त्यांच्यावर जबाबदारी येऊन पडली लहान वयातच त्यांना खूप काही सोसायला लागले हळूहळू मुले मोठी होत गेली .अजय हा आता २६ वर्षाचा आहे. तर विजय हा २१ वर्षाचा यापैकी अजय हा राजेश जैसवार च्या घरी जात येत होता. राजेशची पत्नी सौ.रंजना व अजय यांची ओळख झाली तसे पाहता रंजना हिचे वय ३९ तर विजय चे वय २६ वर्षे परंतु गेल्या पाच-सहा वर्षांपासून या दोघांमध्ये ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले होते.त्या दोघांची मैत्री हळूहळू घट्ट होत गेली ते एकमेकांजवळ खूप काही शेअर करू लागले होते .सौ.रंजना हिला वाटत होते की लालसादेवी आपल्या उत्तर प्रदेशातील आहे आणि आपले गाव आले असून आपण एकाच परिसरात राहतो तर हे सुद्धा आपलेच म्हणायला हरकत नाही. सौ. रंजना व अजय या दोघांतील मैत्री वाढत गेली अजयच्या घरची परिस्थिती गरिबीची असल्याने त्याने एक दिवस मैत्रीण सौ. रंजनाला काही कामासाठी एक लाख रुपये उसनवार मागितले सौ.रंजना हिने मागचा पुढचा विचार न करता आपला चांगला असलेला मित्र अजय याला एक लाख रुपये रोख उसनवार दिले.मात्र या गोष्टीची भनक तिने आपल्या पतीला लागू दिली नाही.एवढी मोठी रक्कम आपण पतीच्या नकळत देतोय ही रक्कम आपल्याला परत मिळेल किंवा नाही याचा विचार न करता तिने जमविलेले पण पतीला माहित नसलेले एक लाख रुपये देऊन टाकले ते पैसे विजयने घेतले व त्याच्या कामासाठी खर्च करून टाकले आता या गोष्टीला जवळ जवळ या गोष्टीला दीड वर्ष उलटून गेले होते.सौ. रंजना व अजय हे एकमेकाला भेटत होते विविध विषयावर बोलत होते तेव्हा सौ. रंजना अजयला म्हणायची की, अजय मी तुला एक लाख रुपये दिले आहेत ते मला परत कर कारण मलाही गरज आहे आणि ते पैसे मी माझ्या पतीच्या नकळत तुला दिलेले आहेत मी तुझी नळ भागविली आहे. मी आपल्या मैत्रीखातर तुला पैसे दिलेले आहेत. त्यावर अजय मात्र तिला म्हणत होता की, रंजना हो ,काळजी करू नकोस मी तुझे पैसे देईर्ल माझी थोडी तंगी चालू आहे .पण हळूहळू सौ.रंजनाच्या लक्षात येऊ लागले की, अजय आपल्याला बनवत आहे. त्याने घेतलेले पैसे परत करायची त्याची इच्छा दिसत नाही आणि विशेष म्हणजे त्यांचा हा व्यवहार लिखित नव्हता. त्यामुळे तिला आता काळजी वाटू लागली होती की, आपले पैसे परत मिळणार किंवा नाही म्हणून ती चिंताग्रस्त राहू लागली होती. कारण की ,आता मुलंही मोठी होत होती तिला मुलीच्या लग्नाचीही चिंता सतावत होती . आपण जमवलेले एक लाख रुपये उगाच दिले याचा तिला आता पश्चाताप वाटत होता ?पती ती कामावर गेल्यानंतर ती अजयला फोनवर पैशाची मागणी करू लागली. माझ्याकडे पैसे आले की मी देईन असे म्हणून अजय वेळ मारून नेत होता. दररोजच्या सौ.रंजनाच्या पैशाच्या मागणीने तो वैतागला होता.तो तिला म्हणायचा की, आपली मैत्री आहे .मी तुझे पैसे काही बुडणार नाही.तू मला ओळखत नाहीस का ? त्यावर ती सुद्धा काही वेळेस गप्प राहायची असे हळूहळू एकामागून दिवस महिने उलटत गेले अजयची आई लालसादेवीला ही माहिती होते की,सौ.रंजना व अजय यांच्यात मैत्री आहे आणि त्याने सौ. रंजना कडून एक लाख रुपये


अपर पोलीस आयुक्त
**दत्तात्रय कराळे**


डीसीपी .
**सचिन गुंजाळ**


एसीपी .
**उमेश माने-पाटील**


व.पो.निरी.
**बशीर शेख**

उसनवार घेतलेले आहेत. आणि ती पैशासाठी अजयला वारंवार फोन करूश पैशाची मागणी करीत असते.परंतु पुढे पुढे अजयने तिचे फोन घेणेच बंद केले नंतर त्याने तिचा फोनच ब्लॅक लिस्ट ला टाकला त्यामुळे त्या दोघांचा संपकर्च होत नव्हता आता मात्र सौ.रंजनाला समजून चुकले की, अजय हा आपल्याला पैसे देणार नाही परंतु तिने मनोमन ठरवले की, आपण कमवलेले पैसे कसे काय सोडून द्यायचू म्हणून ती पती राजेश कामावर गेल्यानंतर जवळच राहत असलेल्या लालसादेवीच्या घरी जाऊन तिने लालसादेवीला सांगितले की ,अजय ला मी एक लाख रुपये उसनवार दिले आहेत . त्या गोष्टीला आता एक, दीड वर्ष झाले आहे .मी अजयला पैशाची मागणी करीत आहे पण तो आता पैसे द्यायला टाळाटाळ करीत आहे. एवढेच नाही तर त्याने माझा फोन सुद्धा ब्लॉक केला आहे हो माझे फोन घेतच नाही. त्यावर लालसा देवी म्हणाली की काळजी करू नकोस मी त्याला सांगते .मग सौ. रंजना ही लालसा देवीच्या घरी जाऊन अजयला भेटायचा जायची मग तो भेटला की,सुरुवातीला रंजनाने त्याला प्रेमाने पैसे मागण्याचा प्रयत्न केला परंतु अजय हा काही पैसे देत नव्हता नंतर सौ.रंजनाच्या सहनशीलतेचा अंत झाला आणि मग ती त्याच्या घरी जाऊन बडबड करू लागली पैसे मागू लागली तिच्या या त्रासाला अजय ची आई लालसादेवी वैतागली सौ.रंजना कधीही त्यांच्या घरी येऊन पैशांची मागणी करीत असे ,भांडण करत असे त्यांच्या या भांडणाला लालसादेवी व विजय वैतागले होते लालसादेवी ने एक दिवस अजयला सांगितले की ,तू घेतलेले एक लाख रुपये तिला परत कर आणि तुला द्यायला आता जमत नसेल तर तू आमच्या घरातून वेगळा कुठेतरी जाऊन राहा म्हणजे तिची कटकट वाचेल म्हणून अजयने घर सोडले व त्याने कुठेतरी एक रूम भाड्याने घेतली त्यामुळे रंजना व अजय या दोघातील संपकर्च तुटला. सौ.रंजना जेव्हा जेव्हा लालसा देवीच्या घरी जायची तेव्हा तेव्हा अजय तिला भेटतच नव्हता तेव्हा सौ.रंजना लालसादेवी ला म्हणायची की मला अजय कुठे आहे, ? त्याचा पत्ता दे व त्याचा नंबर दे ? परंतु लालसा देवी ही तिला म्हणत होती की अजय कुठे गेला गेला ?तो काय करतो ? हे मला माहिती नाही.तू आता आमच्या घरी येत जाऊ नकोस तू त्याला पैसे देतांना आम्हाला विचारले नव्हते. तू आणि तो दोघे बघून घ्या परंतु सौ.रंजनाला असे वाटत होते की, हे सवर्जण मिळालेले आहेत व त्यांना आपले पैसे द्यायचे नाही पण आपणही त्यांना पैसे सोडायचे नाही असे तिने ठरविले मग ती दोन ,तीन दिवसानंतर दोन ,तीन दिवसानंतर लालसा देवीच्या घरी जात होती व पैशाची मागणी करीत होती सौ.रंजनाला एकच टेन्शन होते की आपण दिलेले पैसे परत मिळावे. नेहमीप्रमाणे सौ.रंजनाने दिवसभर आपले काम आटोपले. सात सव्वासात वाजता अजय अनंतलाल राजभर हा राहत असलेल्या राजभर चाळ ,गुरु गोपाळ, मंदिरासमोर शास्त्रीनगर, चक्की नाका ,कल्याण पूर्व याठिकाणी गेली. घरांमध्ये अजयची आई लालसा देवी व त्याचा भाऊ विजय हे दोघे जण होते. नेहमीप्रमाणे अजय तिला घरात मिळून आला नाही.सौ. रंजनाने त्या दोघांना पैशांची मागणी केली आणि त्यावरून दोघांत भांडण झाले.सौ. रंजना लालसादेवी ला शिव्या देऊ लागली तर लालसा देवी सुद्धा सौ. रंजनाला शिव्या देऊ लागली त्या दोघींमध्ये बोलाचाली होऊन भांडण सुरू झाले आणि सौ.रंजनाने रागातच लालसा देवीला धक्का दिला लालसादेवी खाली पडली नंतर त्या दोघींमध्ये धराधरी सुरू झाली. त्यांच्यातील भांडण विजय बघत होता.त्याला राग आला की,माझ्या आइर्ला सौ.रंजनाने मारले याकारणावरून विजय त्या भांडणात पडला आणि त्याने दरवाजा बंद करून घेतला आणि सौ.रंजनाला लालसादेवीने पकडले व तिला त्यांनी बेदम मारहाण सुरू केली ती ओरडू नये म्हणून लालसादेवी ने तिचे तोंड दाबले तर विजयने त्याच्या घरातील किचन मध्ये जाऊन भाजी कापण्याचा धारदार चाकू घेऊन आला व त्याने मागचा पुढचा विचार न करता सपासप सौ.रंजना च्या पाठीवर,पोटावर,छातीवर डोक्यायावर वार केले अचानक झालेल्या या जीवघेण्या हल्ल्याने सौ.रंजना घाबरली.ती जीव वाचवण्याचा प्रयत्न करू लागली.परंतु वेळ आता तिच्या हातातून निघून गेली होती .ती रक्ताच्या थारोळ्यात खाली पडली तरीही लालसादेवी व विजय हे दोघे जण तिला मारतच होते त्यांचा राग अनावर झाला होता. लालसादेवी विसरून गेली की ,आपल्या मुलाला सौ.रंजना ने एक लाख रुपये उसने दिले आहेत. तर विजय सुद्धा रागाने बेभान झाला होता या महिलेने आपल्या भावाला आर्थिक मदत केली आहे. आपण तिला मारहाण करत आहोत हे ते साफ विसरून गेले होते.सौ. रंजना मात्र जीवाच्या आकांताने ओरडण्याचा प्रयत्न करत होती. परंतु त्याचा काही एक फायदा झाला नाही विजयच्या ताकदीपुढे तिचे काही चालले नाही. ती रक्ताच्या थारोळ्यात पडून पाय घासू लागली आणि थोड्याच वेळात ती निपचित पडली .हे पाहून दोघेजण भानावर आले पण त्यांच्या कुकृत्य तर घडून गेले होते. पुढे काय करावे या विचारात ते दोघे जण बसले त्यांच्यासमोर सौ.रंजना चा मृतदेह पडलेला होता त्या दोघांनी साडेसात आठ वाजता घडलेल्या घटनेनंतर पळून जायचा बेत आखला .घरात असलेले पैसे त्या दोघांनी घेतले त्यांच्या कपड्यावर उडालेले रक्ताचे कपडे त्यांनी घरातच काढून ठेवले, दुसरे कपडे त्यांनी बदलवले आणि घराच्या बाहेर पडले आई लालसादेवी व विजय हे दोघे जण वेगवेगळ्या दिशेने पळाले रात्र होत आली होती. काय करावे हे दोघांनाही समजत नव्हते विजय म्हणाला आई तू तुला ज्या ठिकाणी सेफ वाटत असेल त्या ठिकाणी जा मी पण कुठेतरी लपून बसतो जेणेकरून पोलीस आपल्यापर्यंत पोहोचणार नाही. हे दोघेही माय लेकं सराईत गुन्हेगार नसल्याने मृतदेहाची विल्हेवाट कशी लावावी ? पोलीस आपल्यापर्यंत कसे पोहोचणार नाही ? याची काहीच माहिती नसल्याने ते तसेच घराबाहेर पडले.ते दोघेही वेगवेगळ्या दिशेने पळाले रात्र वाढत होती तसे अनेक विचार विजयच्या मनात येत होते .आपल्या हातून फार मोठे वाईट कृत्य घडले याचे त्याला आता वाईट वाटत होते. त्याला पश्चातापही येत होता. आपल्या भावाच्या भानगडीत पडून आईच्या प्रेमाखातर आपण चुकीचे पाऊल उचलले हे त्याला सतावत होतं पोलीस आपल्यापर्यंत पोहोचतील याची त्याला खात्री वाटत होती.काय करावे ? हे उमजत नव्हतं रात्र भयाण वाटत होती अंधा ?र्या रात्री जीव वाचवत हाजी मलंगच्या आजुबाजूच्या जंगलात फिरत होता.रात्र त्याला खायला वाटत होती, खूप भीती वाटत होती. अवघ्या २१ वर्षाचा विजय मनातून खचला होता तो रडत होता आपल्या हातून काय घडले त्याचा पश्चाताप करत होता. पण वेळ निघून गेली होती त्याच्या हातात काहीही उरलेले नव्हते.रात्री तो हाजीमलंगच्या जंगलात बसून होता रातकिडे किर्र किर्र आवाज करीत होते. रात्री त्याला खूप भीती मोठी वाटत होती.आपली आई कुठे असेल ?याचा तो विचार करत होता .रात्रभर विचार करून करून त्याचे डोके दुखायला आले होते .काय करावे काही मार्ग सुचत नसल्याने त्याने सरळ पोलीसांना सरेंडर होण्याचा विचार केला आज नाही तर उद्या पोलीस आपल्याला कोठूनही पकडून आणतील अशी त्याला भीती वाटत होती. रात्रभर त्याला झोपच आली नाही.पहाटे पहाटे तो पाच वाजता जंगलातून कल्याणच्या कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या दिशेने निघाला चालत चालत दोन-अडीच तासाच्या प्रवासानंतर तो पोलीस स्टेशन मध्ये आला. साहेब मला पकडा मी खून केला आहे असे तो म्हणू लागला. त्यादिवशी सकाळी ७ वाजता कोळसेवाडी पोलीस ठाण्यात विजय सरळ ठाणे अंमलदार यांच्यासमोर गेला आणि म्हणाला की साब मैने और मेरी माँ ने मिलकर रंजना का मर्डर कर दिया है और हमारे घर मे उसकी लाश पडी है ,हे ऐकून अंमलदार यांनी त्याला बाकड्यावर बसवले व काय झाले हे नक्की त्याच्या कडून जाणून घेतले .सदर गंभीर बाब समजून घेतल्यानंतर त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक बशीर शेख यांना माहिती दिली शेख यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन घटनेची शहानिशा करण्याचे आदेश दिले.स्टेशन डायरी ला तशी नोंद करुन एक पोलीस पथक विजयला सोबत घेऊन त्याच्या घरी गेले .घराला बाहेरून कुलूप लावले होते त्यांनी त्याच्या जवळ असलेल्या चाबीने कुलूप उघडले घरात प्रवेश केला असता घरात रक्ताच्या थारोळ्यात एक चाळीशीच्या वयातील महिला पडलेली त्यांना दिसली ताबडतोब पोलीस पथकाने घटनास्थळाची व मृतदेहाची बारकाइर्ने पाहणी केली असता ती मयत झाल्याचे त्यांच्या लक्षात आलेव. पो.निरी.बशीर शेख यांनी एसीपी उमेश माने-पाटील व डीसीपी सचिन गुंजाळ तसेच अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे यांना कळविले असता त्यांनी तात्काळ घटनास्थळी येऊन मयताची व घटनास्थळाची पाहणी करून पुढील कारवाइर्चे आदेश दिले. पोलीसांनी दोन पंचांसमक्ष मयत सौ. रंजना हिच्या मृतदेहाचा इंनक्वेस्ट पंचनामा करून घटना स्थळाचा पंचनामा केला व त्याठिकाणी ताबडतोब फॉरेन्सिक टीमला त्यांनी बोलावले घटनास्थळावरून रक्ताचे नमुने मयताच्या डोक्यावरील केसाचे नमुने ,रक्ताने माखलेले कपडे जप्त करण्यात आले तसेच आरोपी विजय याचे याने घरात लपवून ठेवलेले त्याचे रक्ताचे कपडे व त्याच्या आइर्चे रक्ताने माखलेले कपडे चाकू जप्त केले. सदर महिले बाबत विजय कडे पोलीसांनी चौकशी केली असता ती याच परिसरात प्रभावती निवास रूम नंबर २५६ शास्त्रीनगर ,मलंग रोड, चक्की नाका कल्याण पूर्व या ठिकाणी रहात असल्याचे त्याने सांगितले .तात्काळ दोन पोलीस सौ.रंजना च्या घरी गेले तेव्हा सकाळी सकाळी आपल्या घरी पोलीस आल्याचे पाहून राजेश जैसवार घाबरला कारण की,काल पासून त्याची पत्नी सौ.रंजना ही घरी आली नव्हती त्याने तिचा शोध घेतला परंतु ती मिळून आली नव्हती. तो आज सकाळी सुद्धा तिचा तपास घेणार होता त्यानंतर तो पत्नी हरवल्याची तक्रार देण्यासाठीही पोलीस स्टेशन मध्ये जाणार होता .पण अचानक पोलीसांना पाहून त्याला वाटले की,काहीतरी अघटित घडले असावे पोलीसांनी ताबडतोब त्याला आपल्या सोबत घेतले व राणी रुक्मिणीबाई रुग्णालय कल्याण येथे घेऊन गेले. तेथे त्यांनी मृतदेह दाखवला तो मृतदेह पाहून राजेशने हंबरडा फोडला तो म्हणाला साहब ये तो मेरी बींवी रंजना है उसको किसने और क्यू मारा असे म्हणत तो जोरजोराने रडू लागला.पोलीसांनी मृतदेहाचे पोस्टमार्टम झाल्यावरतिचे प्रेत तिच्या पतीच्या ताब्यात दिले.पोलीसांनी विजयला पोलीस ठाण्यात आणले आणि दि.१० एप्रिल २०२२ रोजी त्याला रीतसर अटक केली त्याने पोलीसांना स्वत:हून सॅरेंडर केले.कोळसेवाडी पोलीस ठाण्यात आरोपी विजय अनंतलाल राजभर वय २१ वर्ष व त्याची आई लालसादेवी अनंतलाल राजभर वय ५५ या दोघांच्या विरोधात गुन्हा रजिस्टर नंबर १७९/२०२२ भा द वि ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला कल्याण कोर्टात हजर करण्यात आले कोर्टाने त्याला १६ एप्रिल २०२२ पर्यंत रिमांड दिली.

पोलीसांनी विजयकडे तू रंजनाचा खून का व कशासाठी केला याची चौकशी केली असता त्याने पोलीसांना सांगितले की ,साहेब माझा भाऊ अजय व मयत रंजना यांच्यात घनिष्ठ मैत्री होती, त्या मैत्रीखातर रंजनाने माझ्या भावाला एक लाख रुपये उसने दिले होते त्या गोष्टीला आता एक ते दीड वर्ष झाला आहे. रंजना ही सतत माझ्या भावाला पैशाची मागणी करत होती आणि आमच्या घरी येऊन भांडण करत होती तिच्या भांडणाला आम्ही वैतागून माझ्या भावाला आइर्ने व मी घरातून दुसरीकडे राहण्यासाठी जा असे सांगितले होते त्यानुसार तो दुसरीकडे राहायला गेला होता आम्हाला वाटले की रंजनाची कटकट कमी होइर्ल परंतु तिची कटकट कमी न होता वाढली होती ती दररोज केव्हाही आमच्या घरी येऊन पैशाची मागणी करत होती व भांडण करत असायची त्या दिवशीसुद्धा सायंकाळी साडेसात ते आठच्या दरम्यान रंजना आमच्या घरी आली व पैशांची मागणी करून भांडण करू लागली त्या भांडणात तिने माझ्या आइर्ला लोटुन दिले व मारले केस पकडले याचा मला राग आला .माझ्या आइर्ला तु का मारतेस म्हणून तिला विचारणा करत मी घराच्या आतून दरवाजा लावून घेतला व तिला मारहाण करु लागलो.मला इतका राग अनावर झाला होता मी घरातील किचन मध्ये जाऊन चाकू आणला व चाकूने तिच्यावर वार केले त्याने रंजनाच्या डोक्यावर ,छातीवर ,पाठीवर ,पोटावर वॉर केले .तर माझ्या आइने तिला पकडून ठेवलं होतं हे ऐकून पोलीसही चक्रावले निव्वळ पैशाच्या वादातून व त्यांचा काही संबंध नसताना निव्वळ रागाच्या भरात विजयने आपले भविष्य अंधार कोठडीत लोटले तर त्याच्या आइने सुद्धा आपण आपल्या पती नंतर मुलांना लहानाचे मोठे केले आहे याची जाण न ठेवता एका गुन्ह्यात अडकवले. सौ.रंजनाच्या पतीला पोलीसांनी जेव्हा विचारले की रंजनाने अजयला एक लाख रुपये दिले होते हे तुम्हाला माहिती होते का तेव्हा तो म्हणाला की मला याबद्दल काहीही माहिती नाही व त्यांच्यात मैत्री आहे याचीही मला कल्पना नाही. एक हसता खेळता परिवार दुभंगला गेला . सौ. रंजनाने वीस वर्ष केलेली मेहनत फुकट घालवली चांगला सुखी संसार असतांना पदरात तीन अपत्य तेही कॉलेजमध्ये शिकत असताना पती जीवापाड प्रेम करत असून तो संसारासाठी राबराब राबत असतानासुद्धा तिने एका २६ वर्षीय तरुणाशी मैत्री केली आणि ती मैत्री तिला खूपच महागात पडली मैत्रीखातर तिने मित्राला पैसे दिले आणि स्वत:चा जीव गमावून बसली. कोळसेवाडी पोलीस ठाण्यात राजेश शिवधारीलाल जैसवार वय ४६ यांच्या फिर्यादीवरून आरोपी विजय अनंतलाल राजभर वय २१ व लालसादेवी अनंतलाल राजभर वय ५५ या दोघांच्या विरोधात गुन्हा रजिस्टर क्रमांक गु.रजि.नं.१७९/२०२२,भा.द.वि. ३०२, ३४ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून विजयला अटक करण्यात आलेली आहे तर या गुन्ह्यातील आरोपी असलेली महिला लालसादेवी राज्भर ही त्या दिवसापासून फरारी आहे. पोलीसांनी तपास सुरू केला असून ती अजूनही पोलीसांना सापडलेली नाही.यासाठी पोलीसांची दोन पथके तयार केलेली आहेत. एक पथक एपीआय बोचरे व दुसरे पथक एपीआय डोके मल्लिनाथ यांच्या नेतृत्वाखाली स्थापन करण्यात आले असून या घटनेचे तपासाधिकारी पो.निरी.(प्रशासन) चंद्रकांत मनोहर कदम यांनी यासंदर्भात तपास करून लवकरच आम्ही वरिष्ठांच्या मार्गदर्शना खाली फरार असलेल्या आरोपी लालसादेवी हिला अटक करू असे सांगितले आहे.

या गुन्ह्यासंदर्भात अप्पर पोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे ,डीसीपी सचिन गुंजाळ, एसीपी उमेश माने - पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व वरिष्ठ पोलीस निरीक्षक बशीर शेख यांच्या नेतृत्वाखाली तपास अधिकारी पोलीस निरीक्षक (प्रशासन) चंद्रशेखर कदम हे त्यांचे सहकारी एपीआय डोके, एपीआय. बोचरे यांच्या सह डी बी चे पोलीस नाईर्क मिलिंद बोरसे, सांगळे, एस. बी कडू ,सचिन काळे ,पोलीस हवालदार (रायटर) एस.जी. कोळी पोलीस फरारी लालसादेवीचा शोध घेत आहे . ★★★

# राज्याच्या नियोजनबद्ध अंमलबजावणीने योजना सर्वदूर पोहचल्या - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

## केंद्राच्या योजनांमध्ये राज्याचा मोठा वाटा

### पंधरा जिल्ह्यातील लाभार्थींशी साधला संवाद पक्षभेद, राजकारण विसरून लोकांपर्यंत लाभ पोहचविणे महत्वाचे

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई** : योजना केंद्राच्या असोत किंवा राज्यांच्या असोत, त्या सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचण्यासाठी राज्याच्या यंत्रणेचे मोठे योगदान असते. हे प्रयत्न पक्षभेद विसरून आणि राजकारणविरहित झाले पाहिजेत. मला आनंद व समाधान आहे की, या योजना राज्य, जिल्हा, तालुका पातळीवर प्रशासकीय यंत्रणेने नियोजन पूर्वक लाभार्थींपर्यंत यशस्वीरित्या पोहचविल्या असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले.

विविध केंद्रीय योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थींशी सहयाद्री अतिथीगृहातून संवाद साधतांना ते बोलत होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी कार्यक्रमांतर्गत ग्रामविकास विभागाने राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन केले होते, त्यानिमित्त मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील प्रत्येक लाभार्थीशी संवाद साधून त्यांना योजनांचा लाभ कसा मिळाला तसेच त्यांच्या आणखी काही अपेक्षा आहेत का ते जाणून घेतले. ग्रामविकास राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांनी देखील आपले विचार व्यक्त केले.

यावेळी मुंबईचे पालकमंत्री अस्लम शेख, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रारंभी ग्रामविकास विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी मुंबईमधील यासीन शब्बीर शेख, निशा शर्मा, कुंजू पवार या महिलांना प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या लाभाचे प्रमाणपत्रही मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या हस्ते देण्यात आले.

**योजनांमध्ये राज्याचा मोठा सहभाग**

केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये राज्याचाही 40 टक्के वाटा आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्याच्या प्रशासकीय यंत्रणेने अगदी तालुका आणि गाव पातळीवर काम करून या योजनांचे लाभ लोकांपर्यंत पोहचविले आहेत आणि लाभार्थींच्या चेहऱ्यावरचे समाधान पाहिले की हीच आपल्या आयुष्याची कमी वाटते.

**महाराष्ट्राच्या प्रभावी कामगिरीचे कौतुक**

प्रधानमंत्री आवास योजनेत राज्यात ५,००,००० घरे ग्रामीण भागात बांधली असून यंदाही ५ लाख घरे बांधत आहोत. ३५०० कोटी रुपयांचा निधी यासाठी उपलब्ध करून दिला आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की. २०२२-२३ मध्ये जल जीवन मिशनमध्ये १९ लाख कुटुंबास नळ जोडणी व पिण्याचे शुद्ध पाणीपुरवठा देण्यासाठी १९०० कोटी इतका निधी उपलब्ध करू दिला आहे.याशिवाय पोषण अभियान, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना स्वच्छ भारत योजना (ग्रामीण व शहरी) इतर केंद्र शासन पुरस्कृत योजना राबविण्यात राज्य, जिल्हा आणि तालुका स्तरीय यंत्रणाच्या सक्रीय सहभाग व नियोजनबद्ध अंमलबजावणीमुळे योजनांचा लाभ पोहचविणे शक्य झाले असेही ते म्हणाले.

**व्याज परतावा सुरू करा**

यावेळी बोलतांना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ भागवत कराड यांना देखील केंद्राने बंद केलेला पीक कर्जावरील दोन टक्के व्याज परतावा परत सुरू करावा व लाखो शेतकऱ्यांची अडचण दूर करावी अशी विनंती केली.

**अंमल बजावणीचा दुष्काळ महाराष्ट्रात नाही**

केवळ योजनांचा सुकाळ आणि अंमल बजावणीचा दुष्काळ असे चित्र महाराष्ट्रात नसून शेवटच्या घटकांपर्यंत अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी अगोदरच्या पिढ्यांनी लढा दिला आहे. आपल्या देशातल्या लोकांना समाधानाने जीवन जगावे लागता यावे म्हणून प्रयत्न करून या पिढ्यांचे योगदान सार्थ ठरवते अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी महाआवास त्रैमासिक, आझाद का अमृत महोत्सव प्रगती अहवाल, मिशन महाग्राम या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी साधलेल्या संवादात, नगर जिल्ह्यातील दरेवाडीचे मीरा कारंडे, लोणी बुद्रुकचे विनोद पारखे, चांदेगावचे सुखदेव उबाळे, कोल्हापूर जिल्ह्यातील हसुर दुमालाचे जिजाबाई पाटील, सांगरुळचे लक्ष्मी साठे, अर्जूनीचे नितीन आढाव, नाशिक जिल्ह्यातील कवनईचे आनंद पाटील, सटवाई वाडीचे नामदेव मेधाने, बागलाणचे मीरा पवार, नागपूर जिल्ह्यातील भंडारबोडीचे मीराबाई गणवीर, सुमन दोनारकर, खेर्डीचे संगीता निकम, औरंगाबाद जिल्ह्यातील रायपूर येथील बाळू राऊत, भराडीचे कृष्णा महाजन, फुलंब्रीचे सुवर्णा भुईगल या लाभार्थीनी आपले मनोगत व्यक्त केले.

# डोंबिवली पश्चिमेत एक कॅमेरा आपल्या देशासाठी - नागरिकांना मोफत कॅमेरे वितरण कार्यक्रम संपन्न

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**डोंबिवली** : एक कॅमेरा आपल्या देशासाठी आपल्या समाजाच्या रक्षणासाठी या संकल्पनेवर आधारित डोंबिवली पश्चिम मधील विष्णुनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १००० सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे मोफत वितरण नुकतेच करण्यात आले.हे कॅमेरे चिंचोळ्याचा पाडा , खाडी परिसर, रागाई मंदिर व परिसरामध्ये १४०इमारती तसेच सत्तर चाळींच्या परिसरात बसवण्यात येणार आहेत. या कॅमेऱ्यामुळे पोलिसांना गुन्ह्याचा तपास करणे अधिक सोयीस्कर होणार असून समाजकंटकांना चाप बसणार आहे.

डीसीपी सचिन गुंजाळ कल्याण परिमंडळ - ३. यांनी आपल्या झोनमधील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना आपापल्या परिसरात असलेल्या सोसायट्या, धार्मिक स्थळ, व्यापारी संकुल,रुग्णालय, कॉलेज, शाळा,बँका ,हॉटेल, बस स्टँड रिक्षा स्टॉप आदी अशा महत्त्वाच्या ठिकाणी एक कॅमेरा सोसायटी शाळा किंवा इमारतीच्या बाहेर रस्त्यावरील दृश्य टिपण्याचा उद्देशाने लावण्यात यावे असे आवाहन डिसीपी गुंजाळ एसीपी



मोरे यांनी केले होते . सदर काम हे गेल्या एक महिन्यापासून सुरू होते. या उपक्रमासाठी तातडीने माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांनी अर्थसहाय्य केले.

विष्णुनगर पोलीस स्टेशन - ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांच्या देखरेखखाली माजी नगरसेवक मा. विकास गजानन म्हात्रे तसेच नगरसेविका मा. कविता विकास म्हात्रे ह्यांच्या नागरिकांबद्दल असलेल्या कर्तव्यभावनेतून, एक कॅमेरा ! आपल्या देशासाठी !! आपल्या समाजाच्या सुरक्षेसाठी !!! ह्या सामाजिक धोरणाचा पाठपुरावा करत काल मा. सहाय्यक पोलीस आयुक्त सन्मा .श्री जे.डी. मोरे ,तसेच मा. वरिष्ठ पोलिस निरीक्षक सन्मा. श्री. पंढरीनाथ भालेराव साहेब ह्यांच्या हस्ते प्रभागात मोफत सीसीटीव्ही कॅमेरा वाटप करण्यात आले. या कॅमेऱ्यामुळे समाजकावर लक्ष ठेवता येणार आहे.

या स्तुत्य उपक्रमात योगदान देत शहर सुरक्षेला प्राधान्य देण्यात यावे अशी अपेक्षा पोलिसांतर्फे करण्यात आली असून एसीपी मोरे यांनी पोलिसांचे मनुष्यबळ कमी असल्याने या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामुळे पोलिसांना खूप मोठी मदत होणार आहे असे सांगून गुन्हेगारांना तात्काळ जेरबंद करण्यासाठी याचा फायदा होईल म्हणून लोकप्रतिनिधींनी या अशा उपक्रमात योगदान देण्याची नितांत गरज असल्याचे त्यांनी म्हटले. उदाहरणादाखल ते म्हणाले की टिळक नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका महिलेच्या खुनाचा तपास सीसीटीव्ही फुटेजच्या सहाय्याने अवघ्या १३ तासात करता आला होता तसेच सोनसाखळ्या चोरीच्या घटनांना यासाठी आळा बसेल असे ते म्हणाले.

याप्रसंगी अनेक मान्यवर उपस्थित होते.

★★★

# अनधिकृत शाळेत प्रवेश न घेण्याचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांचे आवाहन

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**ठाणे** : जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने ग्रामीण भागातील ३८ अनधिकृत शाळांची यादी जाहीर केली आहे. संबंधित संस्था चालकांनी त्यांचे संस्थेमार्फत सुरु असलेल्या अनधिकृत प्राथमिक शाळा/वर्ग तात्काळ बंद करुन तसे हमीपत्र प्राथमिक शिक्षण विभागास सादर करण्याचे आदेश प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी दिले आहेत. त्याचबरोबर अनधिकृत शाळामध्ये पालकांनी आपल्या पाल्यांचा प्रवेश घेवु नये असे आवाहनही डॉ.कारेकर यांनी केले आहे.जिल्हातील मुरबाड, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, शहापूर आदी ग्रामीण तालुक्यात एकूण ३८ प्राथमिक शाळा अनधिकृत आहेत. यां शाळांच्या संस्था चालकांनी अनधिकृत शाळा/वर्ग तात्काळ बंद न केल्यास संबंधित संस्था चालका विरुध्द बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम १८(५) व १९ (१) मधील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

**अनधिकृत शाळांची यादी**

अंबरनाथ तालुक्यातील गोकुळ कॉन्व्हेंट स्कूल, रेन्बो इंग्लिश स्कूल, खरड, श्री.समर्थ स्कूल नेवाळी रुद्रा इंग्लिश मिडीयम स्कूल वांगणी (प.), प्रगती विद्या मंदिर पाले, सनशाईन इंग्लिश स्कूल उमरोली, मुरबाड तालुक्यातील ऑक्सफोर्ट पब्लिक स्कूल, भिवंडी तालुक्यातील एम.एन.तरे इंग्लिश मिडीयम स्कूल धामणगांव, इंग्लिश मिडीयम स्कूल कुंदेफाटा, नॅशनल इंग्लिश स्कूल दापोडे, लिओ इंटरनॅशनल स्कूल काल्हेर, लिओ हायस्कूल काल्हेर, वेदिका इंग्लिश मिडीयम स्कूल काल्हेर, द विनर्स इंग्लिश मिडीयम स्कूल कांबे, अवेंचुरा नॅशनल स्कूल कोन, खान सदरुद्दिन प्रायमरी स्कूल कारीवली, अग्नीमाता इंग्लिश स्कूल पिंपळास, व्ही.पी.इंग्लिश स्कूल पिंपळास, समर्थ विद्यालय तलाई पाडा पिंपळनेर, ईडू स्मार्ट इंग्लिश स्कूल सावरोली, इकरा नॅशनल स्कूल पडघे, कल्याण तालुक्यातील बी.आर.डी. स्कूल घोटसई, युनिक इंग्लिश मिडीयम स्कूल टिटवाळा, केंन्ट ग्लोबल पब्लिक स्कूल गुरवली, राया इंग्लिश स्कूल, राया, नवज्योती बेथनी विद्यापिठ रुंदे, प्रकाश किड्स स्कूल खडवली (पुर्व.), जी.के.इंग्लिश हायस्कूल खडवली (पुर्व.), सावित्रीबाई फुले इंग्लिश प्रायमरी स्कूल म्हारळ, सावित्रीबाई फुले इंग्लिश प्रायमरी स्कूल म्हारळ, विवेकानंद इंग्लिश हायस्कूल, निलम इंग्लिश स्कूल नांदीवली, आदर्श विद्यालय लोढा हेवन निळजे, डीन्गोटी कॉन्व्हेंट स्कूल कोळेगांव, सरस्वती इंग्लिश स्कूल दहिसर, आयडीएल इंग्लिश स्कूल पिंपरी, शहापूर तालुक्यातील एम.आर.राणे प्राथमिक शाळा आसनगांव, शारदा इंग्लिश मिडीयम स्कूल शेरे, एम.जे.वर्ल्ड स्कूल आदि शाळा या अनधिकृत शाळा म्हणून घोषित करण्यात आल्या आहेत. ★★★

क्राईम बॉर्डर

# गांजासाठी पैसे हवेत म्हणून प्रवासा दरम्यान केली ओला चालकाची हत्या!...

पान नं. १ वरुन...

आणि प्रशांत पेरिय (१९) या चार जणांना अटक केली आहे. तर यात एक अल्पवयीन आरोपीला देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या पाचही जणांना पोलिसांनी ठाणे न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने या आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. अटक केलेल्या आरोपींची पोलिसांनी कसून चौकशी केली असता आरोपींना गांजा आणि नशेची लत आहे. आरोपींनी बदलापूर येथून दिवा येथे येण्यासाठी ओला गाडी बूक केली. गाडी दिवा गावाजवळ आल्यानंतर आरोपींनी गाडी खर्डी रोडजवळ लघुशंका करण्यासाठी थांबवली. नशा करण्यासाठी आरोपींना पैसे हवे होते म्हणून त्यांनी ओला चालकालाच मारहाण करण्यास सुरुवात केली. ओला चालकाच्या खिशातून आरोपींनी अडीच हजार रुपये आणि एक मोबाईल फोन जबरदस्तीने काढून घेतला. ओला चालकाने प्रतिकार केला असता आरोपींनी त्याच्या डोक्यात दगड आणि पेव्हरब्लॉकने जोरदार प्रहार करून त्याची हत्या केली. फक्त नशा करण्यासाठी या आरोपींनी ओला चालकाची हत्या केली असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले असून या आरोपींनी या आधी अशाप्रकारे काही गुन्हे केले आहेत का याचा तपास शिळ डायघर पोलीस करत असल्याची माहिती कळवा मुंब्राचे सहाय्यक पोलीस आयुक्त व्यंकट आंधळे यांनी दिली आहे.

# नवीन सुवर्णा क्राईम बॉर्डर के महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी पद पर पुनर्नियुक्त



: क्राईम बॉर्डर प्रधान कार्यालय :

पुलिस और अपराध जगत की जानकारी देने वाले क्राईम बॉर्डर अखबार और न्यूज पोर्टल के महाराष्ट्र प्रतिनिधी पद पर डोंबिवली स्थित नवीन वेंकप्पा सुवर्णा इनके सामाजिक कार्य को नजर में रखते हुए प्रधान संपादक राजेंद्र वखरे इन्होने उन्हे, क्राईम बॉर्डर के महाराष्ट्र राज्य प्रतिनिधी (FL) पद पर मानसेवी नियुक्त किया है . बता दे कि , नवीन वेंकप्पा सुवर्णा पिछले एक साल से क्राईम बॉर्डर से जूडे हुए है . उन्हे लगातार दुसरे साल नियुक्त किया गया है .

नवीन वेंकप्पा सुवर्णा क्राईम बॉर्डर और क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ) के माध्यम से सामाजिक कार्य करने की इच्छा रखते है. उन्हे महाराष्ट्र राज्य में न्यूज रिपोर्टिंग करने का अधिकार बहाल किया गया है ,उनकी नियुक्ती से मित्र परिवार में ख़ुशी का माहौल छाया है सबने उनको बधाई दी है

# वामन पवार यांची क्राईम बॉर्डर च्या डोंबिवली प्रतिनिधी पदावर नियुक्ती



: क्राईम बॉर्डर (मुख्य कार्यालय प्रतिनिधी) :

पोलीस व गुन्हेगारी जगताची बित्तंबातमी देणारे क्राईम बॉर्डर च्या डोंबिवली प्रतिनिधी पदावर येथील वामन केशव पवार यांच्या कार्याची विशेष दखल घेऊन क्राईम बॉर्डर चे मुख्य संपादक राजेंद्र वखरे यांनी त्यांची मानसेवी नियुक्ती जाहीर केली आहे.

वामन केशव पवार यांनी ३६ वर्ष मुकुंद कंपनी मध्ये नोकरी केली असून त्यांना आता सेवानिवृत्त झाल्यावर क्राईम बॉर्डर परिवार व क्राईम रिपोर्टर वेल्फेअर असोसिएशन (एनजीओ)माध्यमातून त्यांना समाजकार्य करायचे आहे.तसेच जेष्ठ नागरिकांसाठी त्यांना कार्य करायचे आहे . त्यांना डोंबिवली शहरात वृत्तांकन करण्याचा अधिकार बहाल करण्यात आला आहे.त्यांच्या या निवडीने मित्र परिवार व सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. ★★★

# बेपत्ता विवाहितेचा आढळला जळालेला मृतदेह

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : शिरपूर तालुक्यातील नटवाडे येथील अठरा दिवसांपासून बेपत्ता विवाहितेचा जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ माजली आहे. निर्मला सुनिल पावरा असे सदर विवाहीतेचे नाव आहे. सदर विवाहितेस जाळण्यापुर्वी तिचा दगडाने ठेचून खून केल्याचे दिसून आले आहे. अनैतिक संबंधातून ही हत्या झाल्याचा अंदाज लावला जात आहे.

मयत सुनिता पावरा ही विवाहीता तिच्या पतीसह वीटभट्टीवर रोजंदारीने कामाला जात होती. चुलत दिरासोबत तिचे अनैतिक संबंध असल्याचा संशय पतीसह तिचा सासरच्या मंडळींना होता. त्यातून गेल्या काही दिवसांपासून घरात वाद देखील सुरु होते. 13 मे रोजी ती घरा सोडून निघून गेल्यानंतर तिच्या पतीने ती हरवल्याबाबत शिरपूर पोलिसात तक्रार दिली होती.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेचा निकाल जाहिर

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. एमपीएससी २०२० ची मुख्य परीक्षा ४, ५ व ६ डिसेंबर २०२१ रोजी घेण्यात आली होती. त्यानंतर आज मंगळवारी परीक्षा २०२० चा अंतिम निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. प्रमोद चौगुले हा राज्यात सर्वसाधारण उमेदवारांमधून प्रथम आला आहे. तर रूपाली गणपत माने या विद्यार्थीनीनं महिलांमधून बाजी मारली आहे. तसेच गिरीश विजयकुमार परेकर हा मागासवर्ग उमेदवारांमधून राज्यात प्रथम आला आहे. या परीक्षेच्या माध्यमातून एकूण दोनशे पदावर उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे.

★★★

# सीजन हॉटेल मध्ये ७ वर्षांच्या मुलीचा कुजलेला मृतदेह, आई गंभीर जखमी; वडील फरार!



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**मुंबई** : मुंबई जवळील काशी मीरा परिसरातील सीजन हॉटेलच्या खोलीतून ७ वर्षांच्या मुलीचा कुजलेला मृतदेह सापडला असून मुलीच्या आईची प्रकृती गंभीर आहे. प्राथमिक माहितीनुसार, तीन दिवसांपूर्वी या कुटुंबाने वसई परिसरातील एक हॉटेल बुक केलं होतं. गेल्या तीन दिवसांपासून या कुटुंबातील एकही सदस्य खोलीच्या बाहेर आला नव्हता.

याशिवाय या दिवसात कोणी त्यांना भेटायलाही आलं नव्हतं. आज सकाळी १० वाजता या कुटुंबातील पुरुष सदस्य हॉटेलच्या बाहेर आला. यादरम्यान खोलीतून महिलेचा मदतीसाठी हाकेचा आवाज येत होता. त्यानंतर हॉटेल स्टाफने डुब्लिकेट किल्लीने खोली उघडली. यानंतर खोलीतील दृश्य पाहून त्यांना धक्काच बसला.

खोलीच दार उघडताच कर्मचाऱ्यांनी पाहिलं की, महिला गंभीरपणे जखमी झाली आहे. याशिवाय खोलीत खूप दुर्गंधी पसरली आहे. जेव्हा हॉटेल स्टाफने लक्ष देऊन पाहिलं तर मुलीचा कुजलेला मृतदेह खोलीत होता. त्यानंतर तातडीने हॉटेल स्टाफने काशी मारी पोलिसांना घटनेबाबत माहिती दिली. पोलिसांनी जखमी महिलेला रुग्णालयात दाखल केलं असून मुलीचा मृतदेह शव विच्छेदना साठी पाठवण्यात आला आहे.

अद्याप महिला कोणताही जबाब देण्याच्या अवस्थेत नसल्यामुळे पोलीस या प्रकरणात तपास करीत आहेत. मात्र अद्याप मुलीच्या हत्येचं गूढ उकलू शकलेलं नाही. महिलेची प्रकृती स्थिर झाल्यानंतर तिच या प्रकरणात घडलेला प्रकार सांगू शकेल, असं पोलिसांकडून सांगितलं जात आहे.

# शेजारील महिलेची दोन वर्षांच्या चिमुरड्याला अमानुष मारहाण; चिमुरड्याचे हात-पाय फ्रॅक्चर



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**ठाणे** : शेजारचा २ वर्षाचा चिमुरडा घरात आल्याच्या रागातून शेजारी राहणाऱ्या एका महिलेने त्या चिमुरड्याला अमानुषपणे मारहाण केली. यात त्याचे दोन्ही हात व एक पाय फ्रॅक्चर झाला आहे. ही घटना भिवंडी शहरानजीकच्या मीठ पाडा या भागात घडली आहे. मात्र, सुरुवातीला गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या भिवंडी तालुका पोलिसांनी पाच दिवसांनंतर मारहाण करणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल करून घटनेचा तपास सुरु केला. मोहम्मद कैफ सोनू शेख वय २वर्ष असे गंभीर जखमी चिमुरड्याचे नाव आहे.चिमुरड्याची आई मुमताज शेख हिने दिलेल्या महितीनुसार, भिवंडी लगत शेलार ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर मिठपाडा केडीया कंपाऊंड येथील झोपडपट्टीत आपल्या चार मुलांसह राहते. तिच्या पतीचे निधन झाल्यानंतर मुलांची पालन पोषणची जबाबदारी तिच्यावर पडल्याने ती लग्न समारंभात भांडी धुण्याचे काम करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करते. गुरुवार २६ मे रोजी ती सायंकाळी आपल्या १ २ व ७ वर्षांच्या मुलांच्या हाती दोन व दहा महिन्याच्या चिमुरड्यांना सोपवून कामावर गेली असता शेजारी राहणारी आरोपी झरीना या महिलेने दोन वर्षांचा मोहम्मद कैफवर आपल्या घरात आल्याचा राग मनात ठेवून त्यास बेदम मारहाण करत त्याचे हात व पाय मुरगळले अशी माहिती रात्री घरी आल्यावर मुमताज हिला तिची मोठी मुलगी मुस्कान हिने घडलेली हकीकत सांगितली.त्यानंतर शुक्रवारी सकाळी मुमताज आपल्या चिमुरड्याला घेऊन भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात गेली असता तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी आरोपी महिला झरीना हिस बोलावून घेत मुमताज हिस मुलाला प्रथम उपचारासाठी घेवुन जाण्याचा सल्ला दिला. मुमताज हिने जखमी मोहम्मद कैफ यास प्रथम भिवंडीतील स्व. इंदिरा गांधी रुग्णालय येथे घेऊन गेली. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी कळवा येथिल शासकीय रुग्णालयात घेऊन जाण्यास सांगितले. कळवा रुग्णालयात चिमुरड्यावर उपचार सुरू असताना औषध व उपचार साहित्य बाहेरून आणण्यास सांगितल्याने त्यातच मुमताज कडील पैसे संपल्याने मुमताज ही चिमुरड्यास घेऊन सोमवारी सायंकाळी भिवंडीत दाखल झाली. त्यावेळी मुलगा तापाने फणफणत होता.**चार दिवसांनंतर गुन्हा दाखल** याबाबत भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता या प्रकरणी महिला तक्रार देण्यासाठी आली होती. त्यावेळी स्टेशन डायरीला नोंद घेऊन आरोपी महिलेला बोलावून घेतले. परंतु मुलगा गंभीर जखमी असल्याने त्यास प्रथम उपचारासाठी घेऊन जाण्याचा सल्ला दिला तर कळवा पोलिसांनी आम्हाला अजुन कळवले नसल्याचे सांगत तालुका पोलिसांनी हात झटकण्याचा प्रयत्न केला आहे.भिवंडी तालुका पोलीस ठाण्याचा भोंगळ कारभार - विशेष म्हणजे घटना घडून चार दिवस उलटून गेले होते. तरी तालुका पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नसल्याने संताप व्यक्त केला आहे. कळवा रुग्णालयात स्थानिक पोलिसांनी घटनेची नोंद करीत त्याची माहिती वेळीच भिवंडी तालुका पोलीस ठाण्यास का दिली नाही ?असा प्रश्न उपस्थित झाला आहे. एकंदरीतच भिवंडी तालुका पोलीस ठाण्यातील यंत्रणेचा भोंगळ कारभार या घटनेनंतर समोर आला असून यावर वरिष्ठ काय कारवाई करतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. ★★★

# चपाती बनवण्यावरुन सासू सुनेत वाद नवऱ्याने बायकोचा कान फाडला



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**बदलापूर** : अश्विन निकुंभ (वय ३२) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे. निकुंभ कुटूंब बदलापूर पूर्वेकडील शिरगांव भागा तील माऊली चौकातील एका इमारतीमध्ये राहतात. सोमवारी रात्री पत्नी कोमल वय २२ ही किचन मध्ये जेवणाची तयारी करत होती. त्यावेळी त्यांच्या सासूने'चपाती चांगली बनवशिल का?'असा प्रश्न विचारताच सासू सुनेही मी चांगलीच चपाती बनवते.असे बोलताच दोघीत शाब्दिक वाद झाला. हा वाद ऐकून पती अश्विनने पत्नी कोमलच्या डाव्या कानशिलात जोरदार झापड मारली. त्यामुळे पत्नीच्या कानाचा पडदा फाटला आहे. यावेळी त्याने तीला पट्ट्यानेही मारहाण केली. त्यानंतर हे भांडण पोलीस ठाण्यापर्यत गेले दरम्यान पत्नी कोमलच्या तक्रारी वरून पती अश्विन विरुध्द भादंवि. कलम ३२५, ३२४, ५०४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पो.निरी.एच. एम. कुळकर्णी करीत आहेत. ★★★

# एपीएमसी मार्केटमध्ये मित्राने केला मित्राचा खून; घटना सीसीटीव्हीमध्ये कैद

क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई** : वाशी येथील एपीएमसी भाजी मार्केटमध्ये रविवारी एका ४० वर्षीय व्यक्तीची त्याच्याच मित्राने लाकडी दंडुक्याने वार करत निर्घुण हत्या केली आहे. शंकर पानसरे असे या मृत व्यक्तीचे नाव असून 29 तारखेला रात्री ८ च्या सुमारास हा खून झाला.

सीसीटीव्ही फूटेज आणि माहिती देताना पोलीस अधिकारीपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एकाच ठिकाणी आरोपी रवी आणि मृत शंकर हे दोघे काम करत होते. दोघांमध्ये काही अंतर्गत प्रकरणामुळे वाद होता. याचाच राग मनात ठेवून काल रात्री लाकडी दंडूक्याने रवी याने शंकर याच्या डोक्यावर जोरदार प्रहार करत त्याचा काटा काढला. अति प्रमाणात रक्तस्त्राव झाल्यामुळे शंकर याचा जागीच मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. एपीएमसी पोलीस ठाण्यात फरार आरोपी रवी विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस पुढील तपास करत रवीचा शोध घेत आहेत. ★★

# पोटच्या ६ मुलांना विहिरीत ढकलून आईने आत्महत्येचा प्रयत्न केला




क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**महाड** : रायगड जिल्ह्यातील महाडमध्ये ३०वर्षीय महिलेने पोटच्या ६ लहान मुलांना विहीरीत ढकलून दिलं. त्यानंतर स्वत: विहिरीत उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न केला. या धक्कादायक घटनेत महिलेचा जीव वाचवण्यात स्थानिक गावकऱ्यांना यश आलंय. मात्र, सहा कोवळ्या जीवांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. रायगड पोलिसांनी या आईवर मुलांच्या हत्येचा गुन्हा दाखल करून तिला अटक केलीये. तर, तिच्या पतीलाही पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलंय.

रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी बीबीसी मराठीला दिलेल्या माहितीनुसार, ठपतीसोबत भांडण झाल्याने या महिलेने पोटच्या ६ लहान मुलांना विहीरीत ढकलून दिलं. त्यानंतर स्वत: आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मृत मुलांमध्ये पाच मुली आणि एक मुलगा आहे. सर्वात लहान मुलाचं वय दीड वर्ष तर, मोठ्या मुलीचं वय १० वर्ष असल्याची माहिती आहे.

ही हृदयद्रावक घटना महाड तालुक्यातील ढाकलाठी गावात घडली.

उत्तरप्रदेशच्या गोरखपूरमधून मजूरी आणि कामासाठी महाडमध्ये आलेला ३३ वर्षांचा चिखरू सहानी, पत्नी रूना ३० आणि सहा मुलांसह शेलटोली गावात गेल्या महिना भरापासून राहात होता. सहानी कुटुंब मोलमजुरी करून घर चालवत होतं.

रायगडचे पोलीस अधीक्षक अशोक दुधे बीबीसी मराठीशी बोलताना सांगतात, ठया महिलेचं तिच्या पता सोबत भांडण झालं होतं. त्यामुळे पती कामावर गेल्यानंतर सहा मुलांसह ती घराबाहेर पडली. सहनी कुटुंब रहात असलेलं शेलटोली गाव रुनाने आत्महत्या केलेल्या ढालकाठी गावा पासून ३-४ किलोमीटर अंतरावर आहे. रुनाने ढालकाठी गावात शेतात असलेली विहीर गाठली.

संध्याकाळच्या सुमारास स्थानिक आदिवासी ग्रामस्थांनी रुनाला विहीरीत उडी मारताना पाहिलं. त्यांनी तात्काळ विहिरीकडे धाव घेतली. तिला बाहेर काढलं आणि रुग्णालयात दाखल केलं.ठमी माझ्या सहा लहान मुलांना विहिरीत ढकलून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, या महिलेचे शब्द ऐकून स्थानिकांनाही धक्का बसला. घटनास्थळी पोहोचलेले पोलीस, स्थानिक रहिवाशांनी मिळून शोधमोहीम सुरू केली. रात्री १० च्या सुमारास विहिरीतून सहा लहान मुलांना बाहेर काढण्यात आलं. पण, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. पाण्यात बुडाल्या मुळे सहा जीवांचा मृत्यू झाला होता.

आईवर हत्येचा गुन्हा दाखल - रूनावर पोलिसांनी सहा मुलांच्या हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर महाड पोलिसांनी रुनाला अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक पुढे माहिती देताना म्हणाले, ठया महिलेला अटक करण्यात आलीये. तिच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आलाय. तिला कोर्टासमोर हजर करण्यात येईल.

पोलीस अधिकारी सांगतात, ही महिला सद्यस्थितीत काहीही बोलण्याच्या मनस्थितीत नाही. पोलिसांच्या माहिती नुसार,नवरा सारखा दारू पिऊन येत होता. चारित्र्या वर संशय घेत होता. नवऱ्या कडून होणाऱ्या सारख्या मारहाणीला वंटाळून या महिलेने आत्महत्येचा प्रयत्न केला. अशोक दुधे पुढे म्हणाले, ठया महिलेने पहिल्यांदा मुलांना विहीरीत ढकलून दिलं.त्यानंतर तिने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणाच्या चौकशीसाठी पोलिसांनी तीन अधिकाऱ्यांची टीम नियुक्त केली आहे. ★★★

# सोनसाखळी चोर; तबला वादकाला लुटणारा रिक्षा चालक अटकेत



क्राईम बॉर्डर न्यूज नेटवर्क

**डोंबिवली** : डोंबिवली पश्चिमेतील देवी चौकात राहणाऱ्या एका १३ वर्षाच्या तबला वादकाला लुटणाऱ्या रिक्षाचालकाला विष्णुनगर पोलिसांनी अटक केली आहे. रिक्षाचालक सम्राट अनंत मगरे (१९) हा सिद्धार्थनगर झोपडपट्टीत राहतो. त्याने युवा तबला वादकाला लुटल्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीची सोनसाखळी आणि चोरीसाठी वापरलेली रिक्षा विष्णुनगर पोलिसांनी जप्त केली आहे.

डोंबिवली पश्चिमेतील देवी चौकात मोहन भोईर यांचे कुटुंब राहते. मोहन यांचा मुलगा साई (१३) तबला शिकण्यासाठी भागशाळा मैदानातील एका खासगी शिकवणी वर्गात नियमित रिक्षेने येजा करतो. गेल्या बुधवारी रात्री आठ वाजता शिकवणी संपली. साईने घरी जाण्यासाठी भागशाळा मैदानाजवळ एक रिक्षा पकडली. रिक्षाचालक सम्राट मगरेने साईच्या गळ्यातील सोनसाखळी बघितली. तो लुटण्याचा विचार त्याच्या मनात आला. रिक्षाचालक सम्राटने तबला वादक साई भोईरला रिक्षात घेतले.सम्राटला साईच्या गळ्यातील सोनसाखळी लुटायची असल्याने त्याने भागशाळा मैदानाकडून रिक्षा ठाकुर्ली पुलाकडील निर्जन झाडेझुडपे असलेल्या रस्त्याने नेली. साईने चालकाला मला देवी चौकात जायचं आहे. तुम्ही रिक्षा चुकीच्या दिशेने नेत आहात असे सुचविले. आपणास एका मित्राला सोबत घ्यायचे आहे असे सांगून चालक सम्राटने रिक्षा ठाकुर्ली पुलाकडील बावनचाळ निर्जन ठिकाणी नेली. तिथे सम्राटने साईच्या गळ्यातील सोनसाखळी काढून घेतली. साईने त्याला विरोध केला. ही सोन साखळी लहान मुलाने घालायची नसते. ती आपण तुझ्या आईच्या हातात देणार आहोत, असे सांगून सम्राटने रिक्षा पुन्हा देवी चौकाकडे नेली. साईच्या आईने साईला तुला उशीर का होतोय म्हणून मोबाईलवर विचारणा केली. साईने रिक्षा चालक मला उगाच फिरवत आहे, असे सांगितले. मुलाने आपली तक्रार घरी केली, त्याच्या कुटुंबीयांकडून आपण पकडले जाऊ शकतो अशी भीती सम्राटला वाटली. रिक्षाचालक आपणास पळून नेईल या भीतीने साईने त्याला एकेठिकाणी रिक्षा थांबविण्यास सांगितली. सम्राटने वेगाने रिक्षा पळवली. साईने धावत्या रिक्षेतून उडी मारण्याचा प्रयत्न केला. त्याच्या हातमधील मोबाईल चालकाने खेचून घेण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत साईने रिक्षेतून उडी मारून घरचा रस्ता धरला. त्याने घडला प्रकार वडिलांना सांगितला. एका रिक्षा चालकाने मुलाला लुटले असल्याने वडिल मोहन यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरीनाथ भालेराव यांनी भागशाळा मैदान, मुलाला ज्या रस्त्याने नेण्यात आले. त्या रस्त्यावरील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. चित्रीकरणात सिद्धार्थनगर मधील सराईत गुन्हेगार अजय मगरे याने हा प्रकार केल्याचा संशय पोलिसांना आला. पोलिसांनी अजयचे घर गाठले. कुटुंबीयांनी अजयचा लहान भाऊ सम्राट रिक्षा चालवितो असे सांगितले. सम्राटला पोलिसांनी सापळा लाऊन अटक केली. त्याने साईला लुटल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून १५ ग्रॅम वजनाची सोनसाखळी आणि त्याची सव्वा लाख किमतीची रिक्षा जप्त केली. सम्राटने आणखी असे प्रकार केले आहेत का याचा तपास पोलीस करत आहेत. ★★★

Printed , Published, Owned & Editor - Rajendra Shrawan Vakhare, Printed at SIDDHAKALA PRINT MEDIA & PUBLICATIONS PVT. LTD., PLOT. No. W-230, TTC Industrial Area, Khairne MIDC, Navi Mumbai- Dist. Thane.MAHARAHTRA - 400710 Published From - Flat no 219, First Floor, L.I.G Blg No 16, Opp- Birla College Chikanghar, Kokan Vasahat, Kalyan (w), Taluka - Kalyan, Dist- Thane. Pin Code- 421301- (Maharashtra) Mob. 09987496136,09619630035,08655004586 ( REGD.No.MAHBIL/2010/41122 Email - crimeborder@gmail.com Mob.9619630035

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री.राजेंद्र श्रावण वखरे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया,अ‍ॅण्ड पब्लिकेशन प्रा.लि.डब्ल्यू ,२३०, टीसीसी इंडस्ट्रियल एरिया खैरणे,एम आय डी सी , ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई ,जि. ठाणे -४००७१०, येथे छापून फ्लॅट नं. २१९, पहिला मजला, एल.आय.जी. बिल्डींग नं. १६, बिर्ला कॉलेज समोर, चिकणघर, कोकण वसाहत, कल्याण (प.), ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१३०१येथून प्रकाशित केले.(रजि.नं. एमएएचबीआयएल २०१०/४११२२) Email.crimeborder@gmail.com